

समुद्रातील तेलाचा शोध

लेखक: नॉर्मन बेट



समुद्रातील तेलाचा शोध

मराठी अनुवादः सुशील मेन्सन





“मासे पकडून पकडून दमले मी,” कोळंबी पकडणाऱ्या नावेने कुरकुर केली. “मला दिवसभर अवजड जाळं वाहून न्यायचा कंटाळा आलाय. मला काहीतरी वेगळं करायचंय!”



"मासे पकडून तू थकली असशील तर आम्हाला तेल शोधायला मदत कर!" जवळून जाणारी एक आगबोट म्हणाली. तिच्या चिमणीतून निघणाऱ्या काळ्या धुराने ती खेचून नेत असलेल्या जड पडावाला झाकून टाकले होते.


"कोण शोधतं तेल?" कोळंबी पकडणाऱ्या नावेने विचारले.


"आम्ही सगळेच तेल शोधत फिरत असतो," आगबोट उत्तरली. "मजूर, इंजीनिअर, आगबोट, नावा, पडाव, क्रेन, इंजिन आम्ही सगळेच! आम्ही त्याला *तेलासाठी खोदकाम* म्हणतो."

कोळंबी पकडणाऱ्या नावेने तिचे अवजड जाळे फेकून दिले आणि ती आगबोटीच्या मागे जाऊ लागली.

“तेल पाण्यात मिळतं का?” नावेने विचारले.

“नाही,” आगबोट म्हणाली. “ते पाण्याच्या तळाशी असलेल्या जमिनीच्या हजारो फूट खाली मिळतं. आम्ही खोल खड्डा खणतो त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी. मग तिथलं तेल पंपाद्वारे वर खेचतात आणि त्यापासून इंधन बनवतात. या इंधनावर रेल्वे, जहाजं आणि विमानं चालतात.”





हे ऐकून कोळंबी पकडणारी नाव उत्तेजित झाली. हे काहीतरी वेगळं होतं! "मी तेल शोधायला काही मदत करू का तुमची?" तिने विचारले.

"मला मदत करायला तू खूप छोटी आहेस," आगबोट म्हणाली, "पण तू आमचं काम बघू शकतेस." मग शक्तिशाली आगबोट अवजड पडाव मागे-पुढे खेचू लागली, त्याला जोराचा धक्के देऊ लागली. हळूहळू पडाव नव्या तेलविहिरीचे खोदकाम करायच्या जागी पोहोचला.


तिथे एक डिझेल क्रेन उभी होती. "चला, तू योग्य वेळी आपल्या पडावासोबत पोहोचलीस इथे!" क्रेन बडबडली.

मग क्रेनचे लांब हात पडावाच्यावर सरकले. हाताच्या टोकाला असलेला यांत्रिक पंजा पडावातील रेती आणि शिंपल्यांच्या ढिगापर्यंत पोहोचला. मग क्रेनचे गियर फिरू लागले, आवाज करू लागले.

मग क्रेनच्या पंजाने आपल्या मुठीत भरलेले शिंपले काढून समुद्रात फेकून दिले. त्यामुळे पाण्यात लाटा उसळल्या आणि कोळंबीची नाव हेलकावे खाऊ लागली..


"तुम्ही तेल शोधताय का?" तिने विचारले. "मी तुम्हाला मदत करू शकते का?"

"मला मदत करायला तू खूप लहान आहेस," क्रेन तुच्छतेने म्हणाली. "मी समुद्रात रेती-शिंपले फेकून मोठ्या पडावासाठी एक भक्कम पाया तयार करतोय. नंतर तो पडाव तेलाची विहीर खोदेल. त्याला विचार, काही मदत हवी का म्हणून."



खोदकाम करणारा मोठा पडाव पाण्यात ताठ उभा राहिला. त्याचा वरचा मजला यंत्रं, मजूर, खोपटी आणि क्रेन यांनी भरून गेला. शक्तिशाली आगबोटी त्याला खेचून नेऊ लागल्या. कोळंबीची नाव त्याच्या जवळ गेली. “वाटेतून दूर हो!” आगबोटी गरजल्या.







अनेक आगबोटींनी खोदकामाच्या मोठ्या पडावाला खेचून, ढकलून, ढोसून, धक्का देऊन रेती-शिंपल्यांच्या ढीगाच्या भक्कम पायावर नेऊन थांबवला. “माझी इंजिनं सुरू करा! माझे पंप सुरू करा!” मोठ्या पडावाने आदेश दिला.

इंजीनिअरांनी पडावाची इंजिने सुरू केली, त्याचे व्हाल्व उघडले आणि मग तो मोठा पडाव पाण्यात बुडू लागला. “इथेच तेलविहीर खोदायला हवी. दूर राहा सर्वांनी!” तो ओरडला. “मी समुद्राच्या तळाशी जातो आता!”




काहीच क्षणात, सगळ्या नावा मागे गेल्या. पडाव पाण्याच्या खाली, खाली, खाली जाऊ लागला. तो खोल, खोल बुडू लागला. तो जलद, जलद गतीने तळाशी गेला. आता फक्त त्याचा वरचा मजलाच पाण्याच्या वर राहिला.

“सगळी अवजारं आणा.

पाईप आणा.

खोदकाम करणाऱ्या क्रेन आणा.

आता मी खोदकाम करायला सज्ज आहे!” मोठ्या पडावाने गर्जना केली.



“क्रेन आणि पडाव कुठायत?

नावा आणि आगबोटी कुठायत?


आपल्याला घाई करायला हवी. वादळ येतंय!”

आगबोटी आणि नावा आपलं सामान घेऊन पळत आल्या.

“मी इथं आहे,” पडाव ओरडला.


“मी काम करायला तयार आहे.”

“आम्ही इथे आहोत,” नावा आणि आगबोटी किंचाळल्या. “आम्ही खोदकाम करणाऱ्या मनोऱ्याचं सगळं सामान, पाईप वगैरे आणलंय. आम्हीही तयार आहोत!”




मजबूत क्रेन असलेला पडाव वेगाने काम करू लागला. त्याची इंजिने गरजू लागली, त्याच्या तारा खेचू लागल्या आणि त्याच्या लांब हातांनी खोदकाम करणाऱ्या मनोऱ्याचे भाग उचलून पडावाच्या फलाटावर व्यवस्थित ठेवले.

मग मजूर, इंजीनिअर लोक धावले आणि त्यांनी मनोऱ्याचे भाग एकावर एक जोडले. मनोरा उंचच उंच होऊ लागला. नावा आणि छोट्या पडावांनी आणखी सामान, तारा आणि यंत्रे आणली. मग मनोऱ्याचे काम पूर्ण झाले.



“आता खोदकामाचा पाईप आणा,” मोठ्या पडावाच्या फलाटावरील इंजीनिअर लोकांनी आदेश दिला. “आपल्याला दहा हजार फूट खोदायचंय, तेव्हा कुठे तेल मिळेल. लवकर! वारे वेगाने वाहू लागलेयत.”


आगबोटींनी पाईपने भरलेले पडाव आणले. “पाईप खोदकाम फलाटावर न्या,” इंजीनिअरांनी आदेश दिला. “पाईप मनोऱ्यावर चढवा. लवकर – लवकर, आभाळ अंधारू लागलंय!”



यंत्रांनी पाईप उचलून मनोऱ्यापर्यंत नेताना ते एकमेकांवर आदळले आणि घणघण आवाज झाले. लवकर! लवकर! मजूर माकडांसारखे वर चढले आणि त्यांनी प्रत्येक पाईप योग्य त्या जागी जोडला.


यंत्रांचा, तारांचा आणि पाईपांचा आवाज पाण्याला आदळून लाटा उत्पन्न झाल्या. या लाटा कोळंबीच्या नावेला आपटल्यावर ती हिंदकळू लागली. नाव अधिकाधिक नजिक येऊ लागली.





“खोदकामाचं ड्रील यंत्र सज्ज ठेवा!” इंजीनिअरांनी आदेश दिला. मजुरांनी ड्रील यंत्राच्या खालच्या टोकाला खोदकामाचं छोटं यंत्र लावलं. या छोट्या यंत्राला धारदार फिरणारे दात होते. जमिनीखालच्या खडकांचा भुगा करत ते खोलवर शिरणार होते. मजुरांनी हे यंत्र पाण्याखाली समुद्राच्या तळापर्यंत उतरवले.

शक्तिशाली इंजिनांनी पाईपला जखडून ठेवले आणि त्याला एका विशाल ड्रीलसारखे फिरवले. मोठे ड्रील यंत्र समुद्रतळाशी जमिनीखाली खोल, खोल छिद्र करू लागले तसे मोठा पडाव थरथरू लागला, इंजिने गाऊ लागली, पाईप आणि साधनांची आदळआपट होऊन आवाज होऊ लागले.



कोळंबीची नाव खोदकाम फलाटाखाली वाहात गेली. तिला जोरदार लाटांची जाणीव झाली. तिला समुद्रतळाशी खडकांचा भुगा करणाऱ्या ड्रील यंत्राचा आवाज येऊ लागला. ड्रील यंत्र जेवढे खोलवर जात होते तेवढेच वेगाने फिरत होते. पडावाला लाटांचे तडाखे बसू लागले. वारा अधिकाधिक वेगाने वाहू लागला. ड्रील यंत्राने खोलवर, अधिक खोलवर खडकांचा भुगा करण्याचे काम सुरू ठेवले.



“थांबा!” मोठा पडाव गरजला.

“भयानक वादळ येतंय! इंजिनं थांबवा! ड्रील यंत्र थांबवा!

मजुरांना किनाऱ्यावर न्यायला नावा बोलवा! किनाऱ्याकडे जा!”

वेगवान वाऱ्यांमुळे मोठ्या पडावावर पाण्याच्या लाटा उसळू लागल्या.

इंजिने थांबली. ड्रील यंत्रे थांबली. पण मजूर फलाटावरच अडकले.


ते पडावावरून बाहेर पडू शकले नाहीत.



वादळामुळे नावा त्यांच्यानजिक पोहोचू शकत नव्हत्या. लाटा आणि वाऱ्यांनी प्रत्येक नाव खोदकाम फलाटाला आपटून उध्वस्त करायचा प्रयत्न केला. “ती बघा कोळंबी पकडणारी नाव!” आगबोटी किंचाळल्या. “छोटीशी असली तरी ती न आपटता फलाटाखाली गेलीय.”



“ती मजुरांना सुरक्षितपणे किनाऱ्यावर पोहोचवेल!”




मग कोळंबीची नाव खोदकाम फलाटानजिक आली. एका लाटेने तिला वर हवेत उसळवले. “जवळ ये!” फलाटावर अडकलेल्या मजुरांनी विनंती केली. छोटीशी कोळंबीची नाव फलाटाखाली सरकली. लाटेने तिला वर उसळवताच -

- फलाटावरील मजुर तिच्यात उड्या मारू लागले. “सगळे आले!” कोळंबीची नाव ओरडून म्हणाली.

“चला किनाऱ्याकडे निघू!”

वादळ दोन दिवस दोन रात्र सुरू होते. या वादळात मोठा खोदकाम पडाव अगदी एकाकी पडला.



वादळ संपल्यावर, नावा आणि मजूर परतले. खोदकाम करणारा मजबूत पडाव खंबीरपणे उभा होता, पुन्हा काम करायला सज्ज होता!

“कोळंबीची नाव कुठाय?” पडावाने विचारले. “तिने आपल्याला मदत केलीय वादळात. तिला काम करायचं असेल तर माझ्याकडे पाठवा.”

“बघा, मी खूप छोटीसुद्धा नाहीये?” कोळंबीची नाव म्हणाली.

“तू मदत करण्याइतपत नक्कीच मोठी आहेस,” खोदकाम करणारा पडाव म्हणाला. “तू माझ्यासाठी सामान आणू शकतेस – छोटं-मोठं सामान आणि तुटलेल्या वस्तू.”






छोटीशी कोळंबीची नाव उंच फलाटाकडे गेली. क्रेनने तिच्यात खोके, टोपल्या आणि पिंपे उतरवली.

“हे सामान किनाऱ्यावर ने!” मोठ्या पडावाने आदेश दिला.

“मग तिथून नवी साधनं आणि रसद आण.”


“आज मिळेल तेल आपल्याला?” कोळंबीच्या नावेने विचारले.

“उद्या मिळेल का तेल?”



“नाही,” पडाव उत्तरला. “आज-उद्या आपल्याला तेल सापडणार नाही. तेल मिळण्यासाठी साठ दिवस, साठ रात्री आपल्याला ड्रील यंत्राने खोदकाम करत राहावं लागेल.”

साठ दिवस आणि साठ रात्री छोटीशी कोळंबीची नाव मदत करत राहिली. तिने नवं सामान आणि तुटलेल्या वस्तू यांची ने-आण केली. साठ दिवस आणि साठ रात्री कर्कश आवाज करत ड्रील यंत्र खोल, खोल, खोल – थेट खाली दहा हजार फुट खोलपर्यंत खोदत गेले.




अचानक ड्रील यंत्र थांबले!

मग इंजिन बंद झाले, मजुरांनी काम बंद केले, नावा थांबल्या आणि यंत्रांचे आवाज थांबले. ड्रिलिंग फलाट थरथरू लागला. ड्रील पाईपमधून मोठा खडखडाट ऐकू येऊ लागला.

हा खडखडाट मोठा, मोठा होत गेला! मजूर धावले, इंजीनिअर धावले, नावा आणि आगबोटी मागे जाऊ लागल्या. काळ्या रंगाचे कच्चे दुर्गंधीयुक्त तेल पाईपमधून उसळून बाहेर आले! “सुरक्षा व्हॉल्व बंद करा, लवकर!”

“लवकर बंद करा!” इंजीनिअरांनी आदेश दिला.



"तेलाचं कारंजं बंद करा, नाहीतर स्फोट होईल!" चिकट तेल सर्वत्र पसरू लागले. मजूर, यंत्रं, नावा आणि पडाव त्यात भिजून गेले. तेलाच्या काळ्या तवंगाने पाणीही काळे झाले. मजुरांनी त्वरा केली. त्यांनी सुरक्षा व्हॉल्व बंद करून तेलाचे कारंजे बंद केले.

कोळंबीच्या नावेला वाटले की आपल्यावर काळा पाऊस पडला. तेलाने तिच्या खिडक्या धूसर झाल्या. ती काळ्या पाण्यातून मार्ग काढत स्वच्छ, खुल्या समुद्राकडे जाऊ लागली.

"तू का निघून जातेयस? कुठे जातेयस?" नावांनी आणि पडावांनी विचारले.



"तेल शोधायचं माझं काम पूर्ण झालं!" ती उत्तरली.

"मासे पकडण्याच्या तुलनेत हे काम खराब आहे!" स्वच्छ लाटांनी नावेच्या कडांवरचे तेल धुवून काढले, पाण्याच्या तुषारांनी नावेच्या खिडक्या साफ केल्या, समुद्राच्या स्वच्छ हवेने तेलाची दुर्गंधी पळवून लावली. नाव अधिकाधिक दूर गेली. "मी तेल का शोधू?" ती गाऊ लागली, "मासे पकडणं कितीतरी सोपं काम आहे!"

समाप्त